VOL. 5 | ISSUE 2 | MARCH 2019

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)


Mahatma Gandhi

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

SPECIAL ISSUE ON
**DOMESTIC VIOLENCE: RESPONSE AND PREVENTION**



*Issue Editor*
**Manik Panditrao Shinde**

*Associate Editors*
**Madhav Sopanrao Kadam**
**Tukaram Sitaram Garad**

*Editor*
**Dr. Shivaji Baburao Parale**

T.C
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



Scanned with OKEN Scanner

VOL. 5 | ISSUE 2 | MARCH 2019

Impact Factor: 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY PEER REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

SPECIAL ISSUE ON
DOMESTIC VIOLENCE: RESPONSE AND PREVENTION

*Issue Editor*
Manik Panditrao Shinde

*Chief Editor*
Dr. Kalyan Gangarde

*Associate Editor*
Madhav Sopanrao Kadam
Tukaram Sitaram Garad

*Editor*
Dr. Shivaji Baburao Parale

75

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

T.C

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)
*www.mgsociety.in +91 9730721393 +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

Scanned with OKEN Scanner

Special Issue on the Occasion of *Maharashtra State Commission For Women* Sponsored One Day Interdisciplinary State Level Seminar on Domestic Violence: Response and Prevention, on 8h March, 2019, organised by Anand Shikshan Prasarak Mandal, Parbhani- 431401

Full Journal Title: Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
Print ISSN: 2454-5503
UGC Approved Journal No. 63716
Impact Factor: 4.197 (IIJIF)
Frequency: Bimonthly / Language: Multi language / Journal Country/Territory: India
Publisher: Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS)
Subject Categories: Humanities & Cultural Studies

*Chief Editor:*
Dr Kalyan Gangarde, Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
Dr Grishma Khobragade, Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
Dr. Sadhana Agrawal,Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
Dr. Pandurang Barkale, Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
Bharat Gugane, Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
Dr. Dashrath Kamble, Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
Dr. Sachin Bhumbe, Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

EDITORIAL ADVISORY BOARD
Aju Mukhopadhyay,
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
Dr R.T. Bedre,
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
Dr (Mrs.) Smita R. Nagori,
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
Dr Arvind Nawale
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded
Dr Rajiv Kumar,
Associate Professor, Dept. of English, S.K.M University, Dumka, Jharkhand
Dr Kailash Nimbalkar,
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
Tsai-ching Yeh
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
Dr B. N. Gaikwad,
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
Dr Simon Philip,
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
Dr Chandrashekhar Kanase
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

EDITORIAL BOARD
Dr Mahendra Shinde, Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
Dr Ramkishan Bhise, Assistant Professor, SIES Graduate School of Technology, Nerul, Navi Mumbai
Dr Asish Gupta, Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank (Branch: New Marine Lines, Mumbai) | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*



CHRONICLE OF & CULTURAL STUDIES (CHCS) ISSN: 2454-5503 Impact Factor: 4.197 (IIJIF)



कै. शेषरावजी धोंडजी भरोसे

संस्थापक अध्यक्ष – संजीवनी एज्युकेशन सोसायटी, परभणी.

संस्थापक अध्यक्ष – आनंद शिक्षण प्रसारक मंडळ,परभणी.

आमचे "आबा" शिक्षण पंढरीचे वारकरी, संजीवनीचे आधारवड तसेच

असाध्य ते साध्य। करिता सायास।।

कारण अभ्यास। तुका म्हणे।।

या संतोक्ती प्रमाणे ग्रामीण भागातील लेकी–बाळींना शिक्षण मिळावे, या उद्दात हेतूने जीवनाच्या अखेरच्या श्वासापर्यंत प्रयत्नरत राहिले. दि.०५ मार्च (१९४३) या त्यांच्या जयंती दिनानिमित्य ग्रंथरुपी भेट समर्पित करीत आहोत.

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
Lecturer
College, Hingoli
... & Dist Hingoli (MS)

## FROM THE ISSUE EDITOR'S DESK

I am writing to you today to discuss special issue that has become an integral part of the national conversation Violence against women is on the national agenda. Government is making frantic efforts to find solutions. Instances of violence against women in ancient India are mentioned. Mahabharata cites the violence meted out to Dropti. Yudhishtir staked his wife Dropti in gambling and lost her, following which Duryodhana ordered his brother Dushasan to strip her in the royal palace and he attempted to do so, but Lord Krishna came to her rescue. Kans killed seven newborn babies of his sister Devaki. In modern societies also violence against women is a major public health problem affecting women and children.

Historically, the Indian woman has been made to adopt contradictory roles. The strength of a woman is evoked to ensure that women effectively play their traditional roles of nurturance as daughters, mothers, wives, and daughters-in-laws. On the other hand, the stereotype of "a weak and helpless woman" is fostered to ensure complete dependence on the male sex.

She has nothing of her own. Without husband life has no meaning for her. Although the practice of Sati has declined, enforced widowhood is still prevalent. These socio-cultural factors have continued over the years and have put women at risk for various forms of abuse. Women need protection but those with mental illness need more care and protection. social awareness is the most important to protect the woman and also child abuse. We all need to look to ourselves because we all have a role to play in preventing domestic violence and helping those who are facing abuse.

Anyone facing domestic violence should get help from (local program) or from a trained healthcare provider. Women effectively play their traditional roles of nurturance as daughters, mothers, wives, and daughters-in-laws. so we need to work together to make (victim) the last victim of abuse who is ever murdered in our community.

Issue Editor
**Manik Panditrao Shinde,**
Sant Tukaram Arts & Sci. College, Parbhani.

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)





## CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Domestic Violence: Care and Preventive Measures | Shankpale J.R. | 6 |
| 2. | Analytical Study Of Prevention Of Domestic Violence Against Women With Special Reference to DV Act, 2005 | Dr. Harsha Suryawanshi | 9 |
| 3. | Comparative Study Of Vital Capacity Between Sports and Non-Sports Women | Bhushan Wamanrao Bhujbal<br>Dr.Aher Prabhakar | 12 |
| 4. | Indian Society and Dowry System | Vijay Maroti Magare | 15 |
| 5. | Understanding the Feministic Voices against Sexual Harassment | Dr. Mundhe Ramakant D. | 16 |
| 6. | लग्न कर माझ्याशी नको बोलीच्या हुंड्याशी | डॉ. खानापूरकर वर्षा<br>डॉ. कदम उषा | 18 |
| 7. | स्त्रियांवरील अत्याचार आणि पुरूषांची मानसिकता… | माणिक पं. शिंदे | 22 |
| 8. | मराठी कवितेतून व्यक्त होणाऱ्या समकालीन स्त्री जीवनातील अडचणी | डॉ निलेश ए. लंद्दे | 23 |
| 9. | महिला व मुलींवरील कौटुंबिक अत्याचार/शोषण कारणे व उपाय | वंदना वालटकर | 28 |
| 10. | राजकारण व महिलांचे शोषण | डॉ. राठोड डी.बी. | 30 |
| 11. | पुरुषप्रधान संस्कृतीची विकृतावस्था- महिलांचे लैंगिक शोषण | सुरेश भिमराव लेकुळे | 32 |
| 12. | हुंडा व महिलांचे होणारे शोषण-एक अभ्यास | लोडे परमेश्वर लिंब्राजी | 34 |
| 13. | महिलांसमोरील नवी आव्हाने | डॉ. डि.के. खोकले | 36 |
| 14. | कामाच्या ठिकाणी होणारे महिलेचे शोषण/अत्याचार | प्रा. गजानन वा. मरगीळ | 38 |
| 15. | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कुटुंब आणि स्त्री विषयक कायदे | डॉ.एन.जी.सुर्यवंशी | 41 |
| 16. | लैंगिक अत्याचार – कायदा व सुव्यवस्था | प्रा. पल्लवी प्र. जोशी | 43 |
| 17. | विधवा, परितक्त्या आणि लैंगिक अत्याचारास बळी पडलेल्या महिलांचे समाजातील स्थानः एक मानसशास्त्रीय अभ्यास | डॉ. बद्रीनाथ डी.शेळके | 47 |
| 18. | हुंडा व महिलांचे शोषण | तुकाराम वसराम आडे | 49 |
| 19. | धर्मसंस्था व महिलांचे शोषण | रामप्रसाद मो. व्हडगीर | 51 |
| 20. | भारतीय महिलांची स्थिती | मारोती रा. कोल्हे | 54 |
| 21. | अत्याचारित स्त्रिया आणि नैतिकता | डॉ. भुसारे सुनंदा रा. | 56 |
| 22. | भारतीय तत्त्वज्ञानात स्त्रियांचे स्थान | प्रा. सौ. गोदावरी ना. भुसारे | 58 |
| 23. | नौकरीच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ | तुकाराम सिताराम गरड | 60 |
| 24. | लैंगिक शिक्षण : एक काळाची गरज | प्रा. माधव सो. कदम | 62 |
| 25. | लैंगीक अत्याचार : कायदा व सुव्यवस्था | प्रा.चाटसे अशोक ज. | 64 |
| 26. | भारतातील महिलांचे ऑनलाईन लैंगिक शोषन | डॉ. शिवाजी बा. परळे | 66 |
| 27. | आधुनिक युग में महिला सशक्तिकरण | भालेराव सुधाकर ना. | 69 |
| 28. | साहित्य में व्यक्त शोषित नारी | प्रा.डॉ.विजया गाढवे | 71 |
| 29. | महिला सबलीकरण व सत्यशोधकीय तत्वज्ञान | प्रा. सच्चिदानंद फु. खडके | 73 |
| 30. | महिलांवरील कौटूंबिक अत्याचार व उपाय | डॉ.गुरुदास आ.लोकरे | 74 |


SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

21.

# अत्याचारित स्त्रिया आणि नैतिकता.

प्रा. डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र
तत्वज्ञान विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

मानव समाजाची निर्मिती झाली तेव्हा पासून स्त्री-पुरुष हे एकत्र नांदत आले आहेत. पण एक अंतर ठेवून आणि ते म्हणजे स्त्री-पुरुष भेद भावाचे अंतर. जेव्हा माणूस हा जंगली प्राणी होता तेव्हा मात्र तो इतर प्राण्यांप्रमाणेच जंगलात वास्तव्य करत होता. विवस्त्र आवस्थेत जंगलात झाडाझुडपांवर, दऱ्या-डोंगरात वास्तव्य करत होता. तेव्हा तो आपल्या बुध्दीचा वापर करून सुखकारक आजच्या सारखे जीवन जगत नव्हता. पण त्यामुळे त्याला लैंगिक भुक ही आजच्यासारखी अतिरेकी नव्हतो. ज्याप्रमाणे इतर प्राणी पशु-पक्षी हे ठराविक ऋतूमध्येच आपल्या मादीशी समागत करतात आगदी त्याच प्रमाणे मानवही करत असे. तेव्हा त्याला माझे-तुझे ही जण आलेली नव्हती. विवस्त्र अवस्थेत जंगलात भटकण्यारे नर-मादी हे गरजेनुसार शारीरिक भुक भागवत असतं. कदाचित त्या कालखंडात स्वामीत्वाची, उपभोगाची भावना त्यांच्यात निर्माण झाली नव्हती आणि म्हणून ते इतर प्राण्यांप्रमाणे सहसुलभ व्यवहार करत असत. पुरुषाला आपण एखाद्या स्त्रीच्या मुलाचे वडील असू शकतो, किंवा होऊ शकतो ही कल्पनाही नव्हती तो काळ स्त्री प्रधान काळ होता. सर्व जन्मणारी मुलेही स्त्रीचीच असतात. तिच्या ठिकाणी मुले निर्माण करण्याची दैवी शक्ती आहे. म्हणून ती स्वतः एक दैवी चमत्कार आहे असा समज त्या मानव प्राण्यांचा होता कारण ते आजून पूर्ण मानव तयार झाले नव्हते. मानवी विवेक भावना त्यांच्या ठिकाणी प्रबळ नव्हती. म्हणून वानरासारखी आपल्या टोळीची प्रमुख स्त्रीच असायची आपल्या आपत्याचे संरक्षण आपणच करणे गरजेचे असे कारण तेव्हा पिता या पदाचा जन्म झाला नव्हता म्हणून टोळीतील सर्व मुले त्या माता, मावशा, आज्यांची असायची त्यांचे संरक्षण करणे त्या मातांचे कर्तव्य असायचे त्या टोळीतील सदस्य त्यासाठी बांधील नसायचे की त्यांना कोणती नैतिक जबावदारी नसायची. या संदर्भात आपले मत व्यक्त करताना मंगला सामंत म्हणतात, "कळपातील सभासद हे एकमेकांशी कोणत्याही कर्तव्याच्या जाणिवेने बांधलेले नसतात. कळपामुळे सभासदांला स्वतःचे संरक्षण करतो येते, पण कळप स्वतःहून कोणाचे रक्षण करीत नाही."[१] या वरून हे लक्षात येते की त्या कळपातील सर्वजण स्वतःचे संरक्षण करीत असत. पण छोट्या पिल्लांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य हे त्या मातेचे असे. तेथे कुठेही पिता हे पद येत नसे. पण जेव्हा नांगराचा शोध लागला तसेच शेतीचा शोध लागला आणि मानवाला स्त्रीला मुले होण्याचे गुपित कळले. भटक्या आवस्थेत असतांना त्याला हे ज्ञान नसल्यामुळे त्याला स्मृती ज्ञान ही नव्हते कदाचित आणि म्हणून आपल्या सारखी दिणारी मुले ही आपलीच असावीत ही जाणही त्याला नव्हती म्हणून तो त्यांच्या वर आपला हक्क सांगू शकत नव्हता. पण जेव्हा त्याला या गोष्टीचे ज्ञान झाले तेव्हा त्याने सुरूवातीला आपल्या मुलावर आपला मालकी हक्क दाखवण्यास सुरूवात केली. त्यानंतर स्त्रिया जेव्हा गुहेत किंवा एकाच ठिकाणी वास्तव्य करून राहण्यास शिकल्या त्यानंतरही बराचसा काळ नराचे या कळपातून किंवा या टोळीतून त्या टोळीत भटकने सुरुच होते. कदाचित तेव्हा नर-मादी अकर्षण हे तात्पुर्तच असावे. त्यात निश्चितता नसावी किंवा मुक्त लैंगिक संबंधाचा तो काळ असावा. पण जसा मानव माणसाळला, पुरुष माणसाळला म्हणजे एक ठिकाणी वास्तव्य करुन राहू लागला. तसेच त्याला स्मृती जागृत होत गेली. माणसे ओळखायला येवू लागली. ज्या मादीशी आपण संबंध ठेवले त्या मादीशी दुसऱ्या नराने संबंध ठेवू नयेत ही जाणीव जेव्हा झाली तेव्हा पासून स्वामीत्वाला सुरूवात झाली. जस जसा माणसाचा विकास होत गेला तस तसा तो स्त्रीला आपल्या विळख्या, बंधणात आडकवत गेला. उत्तरोत्तर कालखंडात स्त्रीही उपभोग वस्तु बनली. एवढ्या मोठ्या प्रमाणावर तिचे शोषण केले जावू लागले. त्यामधून विवाह पध्दत रूढ झाली आणि स्त्रीवर मालकी हक्क सांगण्याचा कायदेशिर मार्ग पुरुषाला सापडला. आता मानव समाज हा प्रगत समाज म्हणून गणला जावू लागला. तस तसे स्त्रियांचे लैंगिक शोषण हे वाढतच गेले. स्त्री जशी जंगलातून एका ठिकाणी वास्तव्य करु लागली तशी तिची शक्ती कमी होण्यास सुरुवात झाली. कारण डरविनच्या उत्क्रांती वादाचा सिध्दांत सांगतो जर एखाद्या प्राण्याने त्याच्या एखाद्या आवयव वापरात आणला नाही तर तो आवयव निकामी किंवा नष्ट होतो. त्याच न्यायाने स्त्रियांनी सुरक्षित जागा, आसरा शोधल्यामुळे आणि दैनंदिन भटकंती कमी झाल्यामुळे त्याच्या बलाचा वापर कमी होऊ लागला. तसेच त्यांच्याकडे असलेले मातृत्व, मासिक पाळी, बालसंगोपन यामुळे तिची शक्ती काही प्रमाणात संपत गेली. त्याच कालावधीत पुरुषांनी अधीकार गाजवायला सुरूवात केली. वैदिक कालखंडात मोठ्या प्रमाणावर मुली व स्त्रियाच्या शोषणास प्रारंभ झाला. कारण वैदिक कालखंड हा स्त्रियांसाठी अतिशय वाईट कालखंड म्हणून पाहिला जातो. कारण याच कालखंडात स्त्रिया ह्या नरकाचे दार समजल्या जात असत. स्त्रीही पतित, स्त्री ही अमंगल, अपवित्र, हडळ असे वेगवेगळे दुषण स्त्रीला त्या कालखंडात लावले जात असत. त्यामुळे तिचे लवकर लग्न करून टाकणे, हा उपाय त्या समाजाने शोधला होता. साठ वर्षाच्या पुरुषा बरोबर दहा वर्षाच्या छोट्या मुलीचे लग्न लावून दिले जात असे. तिचा नवरा जर काही कालावधीतच मरण पावला तर त्या विधवा मुली वर सर्व पुरूषांचा डोळा असे. अनेक वेळा तिला सासरे, दिर-भावे त्यांच्या हवसेचे बळी पडावे लागत असे. विधवा स्त्रिया छोट्या मुली, एवढेच काय तान्हुले बाळ आणि वयोवृध्द स्त्रिया ही पुरुषांना बळी पडत असत. आजही विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी महिला अत्याचारांचे प्रमाण





काही कमी झाले नाही. उलट वाढतच गेले. राहते घर, गल्ली, शाळा, महाविद्यालय, कार्यालय, कंपनी, नोकरीचे, कामाचे ठिकाण, शेत, मंदिर, स्मशान अशी एकही जागा नाही जिथे महिला ही पूर्णपणे सुरक्षित आहे. अनेक नराधमांच्या हाती सापडून कोळ्या कळ्यांना आपले जीव गमवावे लागत आहेत. कुठे गेली आहे सामाजिक नैतिकता आणि बांधिलकी ? असा प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही. आज समाजात अनैतिकता बोकाळली आहे. प्रत्येक जाण जणू गिधड बनत चालला आहे. वासनांध वणत चालला आहे. चित्रपटातील दृश्य, वेगवेगळया व्हिडीओ या मुळे त्यांच्या वासनेला खत पाणी घातले जात आहे. असे म्हटले जाते की आजच्या स्त्रियांचा पेहराव, तोकडे कपडे हे त्या साठी कारणीभूत ठरत आहे. असेलही काही प्रमाणात पण म्हणून काही पुरूषांनी आपली नैतिकता वेशीला नेवून टांगणे गरजेचे नाही. जेव्हा लहान लहान कोवळ्या कळ्या ज्या की सहा महिने एक वर्ष, चार वर्ष, सहा वर्ष या त्यांच्या शिकार होतात तेव्हा कोणत्या कपड्यात त्यांना त्या नराधमांनी पाहिलेले असते असा प्रश्न निर्माण होतो. त्यांचा कोणता गुन्हा असतो की ज्यामुळे त्या या नराधमांची शिकार बणतात. वासनांध लोकांना लगाम बसला पाहिजे. मानवाने आपली नैतिकता, सामाजिक बांधिलकीचे भान ठेवले पाहिजे. अन्यथा हे प्रकार कमी होणार नाहीत. त्यांना कायद्यानेही कडक शिक्षा ठोठावली पाहिजे. मुळात पुरूषांच्या महिलाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. ती उपभोग वस्तू नाही. ती ही एक माणूस आहे आणि म्हणून सर्वांची नैतिक जबावदारी ठरते की प्रत्येकाने आपल्या आवतीभोवती घडत असलेल्या गुन्ह्यांची पाठराखण न करता ते थांबवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

मानव समाज हा सुसंस्कृत समाज आहे. पण आज तरी मला माणवापेक्षा इतर प्राणी, पशु-पक्षी हेच अधिक नियम बध्द आहेत असं वाटू लागले आहे. कारण समाजामध्ये सतत अनेक वासनाकांड घडतच जात आहेत. त्या नराधमांना, जनावर म्हणावे तर जनावर हे प्रामाणिक आणि त्या-त्या ऋतुचे, नियमांचे पालन करणारे असते त्यामुळे ते अधिक सुसंस्कृत आहे असे म्हणण्याची पाळी आली आहे. त्याचबरोबर अत्याचारीत स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा तुच्छ असा दृष्टिकोनही बदलने गरजेचे आहे. त्या स्त्रीच्या संदर्भात तो एक अपघात असतो. म्हणून त्यात तो दोषी नसते. तिला जीवनात नव्याने उभे राहण्याची संधी देणे ही आपली नैतिकता असते. त्या भिषण अपघातातून सावरण्यास तिला समाजातील इतर घटकांनी मदत केली तरच आपण आपली नैतिक जबावदारी पार पाडल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते.

**संदर्भग्रंथ :-**

१) स्त्री-पर्व, ले. मंगला सामंत नेटवर्क प्रकाशन पुणे पृ.क्र.०८
२) स्त्री स्वात्वाचा शोध, अंजली कुलकर्णी.
३) स्त्री प्रश्न एक आवर्त, अंजली कुलकर्णी

⌘

T.C
Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



Scanned with OKEN Scanner